# प्रकरण पहिले

## लघुकादंबरीचे स्वरूप आणि वैशिष्टये

# प्रकरण पहिले

## लघुकादंबरीचे स्वरूप आणि वैशिष्टये

### १. कथात्मक साहित्याची परंपरा व स्वरूप :

लघुकादंबरी हा "कादंबरी" या वाङ्.मय प्रकारासारखाच असणारा एक वाङ्.मय प्रकार असल्यामुळे कथात्मक वाङ्.मयाच्या एका व्यापक परिप्रेक्षातच त्याचा विचार करणे अपरिहार्य आहे. कथात्मक वाङ्.मयाची परंपरा अतिप्राचीन असून लोकरंजनासाठी किंवा लोकशिक्षणासाठी गोष्ट सांगण्याची पध्दत जगातील सर्व भाषेत फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. कथाकथनाची आणि कथा ऐकण्याची आवड मनुष्यमात्रात निसर्गत: असल्यामुळे अतिप्राचीन काळापासून मानवी समूहात कथात्मक वाङ्.मयाची लोकप्रियता असल्याचे दिसते. वाङ्.मयाचा कथात्मक प्रकार हा सर्व वाङ्.मय प्रकारात लोकप्रिय असून या प्रकाराचा विस्तार आणि विकासही वाङ्.मयाच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात झालेला दिसतो. मराठी वाङ्.मयही याला अपवाद नाही.

प्राचीन मराठी वाङ्.मयातील महानुभविय आद्य-गद्य वाङ्.मयातही कथात्मक परंपरेचे दर्शन घडते. शिवाय लिळाचरित्रातील श्री चक्रधरांनी सारंगपंडिताच्या मुलीला (धाणाईसाला) तिची समजूत काढण्यासाठी सांगितलेली चिऊ-काऊची गोष्ट चक्रधरपूर्व काळातही परंपरेने चालत आलेली आहे. यावरून मराठी कथात्मक वाङ्.मयाची पूर्वपीठिका किती प्राचीन आहे याची कल्पना येते. कथात्मक वाङ्.मयाचे जनसामान्यांमधील असणारे स्थान लक्षात घेऊन प्राचीन कालात धर्मोपदेशकांनी आपल्या धर्मप्रसाराचे साधन म्हणून कथात्मक वाङ्.मयाचा उपयोग केला. प्राचीन कालापासून चालत आलेल्या कथा आजही खेडयापाडयातील सामान्य जनतेने पिढयानपिढया अत्यंत जिव्हाळ्याने जतन केलेल्या आहेत. आजही वृध्द स्त्रियांच्या तोंडून ऐकावयास मिळणा-या मनोरंजक कहाण्या प्राचीन

कथात्मक वाङ्.मयाचाच भाग आहे. प्रसंगी तो पद्यमय असेल, किंवा चरित्रात्मक असेल. परंतु त्याची कथात्मकता निःसंशय प्राचीनतम व अस्सल दर्जाची दिसून येते.

प्राचीन कालखंडातील कथात्मक वाङ्.मयाच्या मौखिक रूपाला पुढे अर्वाचीन कालखंडात अधिक बंदिस्त रूप येऊ लागले. कथात्मक वाङ्.मय हा गद्य वाङ्.मयातील एक उत्कृष्ठ वाङ्.मय प्रवाह असून आधुनिक काळात त्यात अनेक प्रयोग केले जात आहेत.

"मराठी वाङ्.मयाचा इतिहास जरी पाहिला तरी कथात्मक वाङ्.मयात एकीकडून "हितोपदेश", "पंचतंत्र", "सिंहासनबत्तीशी", "इसापनितीचे" भाषांतर "बालबोध मुक्तावली" यासारखे संस्कृतकडून आलेले कथात्मक साहित्य दिसते. तर "बालमित्र" "वेताळपंचविसी" यासारखे ग्रंथ परकीय भाषेतून आल्याचे दिसते." [१]

सुरवातीचे कथात्मक वाङ्.मय रंजन आणि बोध किंबहूना रंजनातून केलेला बोध असेच दिसते. या कथात्मक वाङ्.मयात अद्भूताचे, कल्पिताचे, असंभवनियतेचे प्रमाण अधिक असलेतरी बाल्यावस्थेत ज्याप्रमाणे माणसाला अद्भूताची आवड असते. तशी समाजाच्या बाल्यावस्थेतही या कथात्मक वाङ्.मयाचे स्वरूप अद्भूतरम्य नवलकथांचे असणे स्वाभाविकच होते. मात्र ही अद्भूत सृष्टी वास्तव सृष्टीतील अपूर्णता किंवा असंभवनियता नाहिशी करण्यासाठी निर्माण झालेली असल्यामुळे जगातील सर्वच वाङ्.मयात सुरवातीच्या कथात्मक वाङ्.मयाचे स्वरूप अद्भूतरम्यच राहिले आहे.

वास्तविक पाहता कादंबरीच्या जन्माआधी अस्तित्वात असणाऱ्या कथात्मक वाङ्.मयात महाकाव्य, खंडकाव्य, पुराणकथा, दंतकथा, लोककथा, नीतीकथा, साहसकथा, अद्भूतरम्यकथा अशा कथात्मक वाङ्.मयाचा एक प्रचंड मोठा साठा भारतीय साहित्यात आढळतो. या कथात्मक वाङ्.मयाचे ठळक

वैशिष्ठ्ये सांगताना उषा हस्तक यानी म्हटले आहे की -

"वास्तवतेच्या, दृष्टिकोणातून संभाव्य-असंभाव्य काय ह्या चिंतेपासून हे वाङ्.मय मुक्त आहे. वास्तव सृष्टीतील प्राणीमात्रांचा, निसर्गाचा, वस्तूंचा मानवी जीवनातील घडामोडींचा वगैरे उपयोग ह्या वाङ्.मयामध्येही सातत्याने करण्यात आलेला आहे. मात्र त्यांच्या वास्तविक रूपांमध्ये स्वत:च्या गरजे-नुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य या सृष्टीने उपयोगात आणलेले आहे. म्हणूनच या कथात्म सृष्टीतील पशू-पक्षांना माणसांची वाचा फुटणे, माणसांना पशू-पक्षांची रूपे प्राप्त होणे, करंगळीवर एखादा पर्वत उचलणे, पाण्यावरुन चालणे, मृतात्मा पुन्हा जिवंत होणे, अशा असंभाव्य गोष्टी सहज शक्य असतात. ही कथात्मक सृष्टी आपल्या निर्मितीसाठी ज्या तत्वांची उपयोग करते त्यामुळे सत्यसृष्टीहून तिचे रूप भिन्न असल्याचे, पूर्णतया कल्पित असल्याची प्रतिती येते." २

आधुनिक मराठी वाङ्.मयातील "कथा" व "कादंबरी" हे वाङ्.मय प्रकार कथात्मक वाङ्.मयामध्ये मोडलेले असले आणि कथा, कादंबरींनी नव्या जाणिवां-पोटी जे नवे परिमाण स्विकारले त्यात कल्पिताला अवसर असलातरी ते कल्पित वास्तवाच्या संदर्भात उभे राहिलेले असते. ते पूर्णतया कल्पित असत नाही. म्हणून कथात्म वाङ्.मयातून "कथा", "कादंबरी"ची पृथगात्मता लक्षात घेत असताना या वाङ्.मय प्रकारात वास्तवाचे, व्यवहाराचे, सामाजिकतेचे संदर्भ महत्त्वाचे ठरतात.

कादंबरी या वाङ्.मय प्रकाराबाबत तर ती वास्तववादी प्रवृत्तीची कलाकृती असते. असा समज रूढ झाला आहे. त्यातील रंजकतेच्या घटकापेक्षा वैचारिकतेला अधिक महत्व येत गेलेले दिसते. कादंबरीचे वेगळेपण, त्यातील नव्या जाणिवा लक्षात घेणे गरजेचे आहे. म्हणूनच "लघुकादंबरी" सारख्या नव्या वाङ्.मय प्रकाराचा तात्त्विक दृष्टया विचार करणे गरजेचे ठरते.

२. कादंबरी आणि कथेचे वेगळेपण :

"कादंबरी" व "कथा" यांच्या स्वरूपाचा विचार करीत असताना "कादंबरी" व "कथा" हे दोन्ही वाङ्.मयप्रकार अनुभवार्थ, कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, कथनपध्दती व भाषा या घटकांनीच साकार झालेले असतात. म्हणजेच कथात्म साहित्याचे मुख्य धर्म "कथा" व "कादंबरीत" सारखेच असलेतरी हे दोन्ही वाङ्.मयप्रकार स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आहेत. माणूस हा दोन्ही वाङ्.मयप्रकाराच्या चित्रणाचा विषय आहे. "कथा", व "कादंबरी" यात सकृतदर्शनी जाणवणारा फरक म्हणजे त्यांची लांबी. परंतु दोन्ही वाङ्.मयप्रकारातील फरक केवळ लांबीचा नसून अधिक मूलभूत स्वरूपाचा आहे. हा फरक अकाराचा नसून वाङ्.मयप्रकाराचा आहे.

कादंबरीत जीवनाच्या साकल्याचा, समग्रतेचा वेध घेण्याचा प्रयत्न असतो अशी समग्रता कथेला अभिप्रेत असतेच असे नाही. कथेत मर्यादित जीवनखंडाचे चित्रण केलेले असते. कादंबरीचा पट विस्तृत असल्यामुळे तिथे समग्रता अभिप्रेत असते. कादंबरीत स्थल, कालाचा, घटनांचा विस्तिर्णपट चित्रित होऊ शकतो. एखाद्या पात्राचा संपूर्ण जीवनप्रवास कादंबरी कथेत घेऊ शकते. याउलट कथेला मात्र मर्यादा पडतात.

"पात्र व प्रसंग यामध्ये कालगतीने होत जाणारी स्थितंतरे जशी प्रत्यक्ष जीवनात आढळतात तशी ती कादंबरीत चित्रित करीत जाणे शक्य असते. कारण कादंबरीला कालाचा व अवकाशाचा मोठा पल्ला उपलब्ध असतो. कथेत अशा चित्रणाला वाव नसतो. कथा अनेकदा व्यक्तिजीवनातील किंवा समाजजीवनातील एखाद्या विशिष्ट अवस्थेला भिडताना दिसते. एखाद्या विशिष्ट बिंदूला स्पर्श करून त्याच्या भोवतीचा आसमंत कथा उजळून टाकू शकते. एखादीच भावस्थितीवर केंद्रित झालेली, एखाद्याच प्रसंगातून आकारणारी अशीही कथा असू शकते. जीवनाच्या अमर्याद गुंतागुंतीत शिरून जीवनातले सत्य शोधणे हे कथेचे काम नसून कादंबरीचे काम आहे." [३]

"कथा", "कादंबरी" यासारखी कलाकृती ही अनुभवांची एक संघटना असते आणि प्रत्येक वाङ्.मयप्रकारात अनुभव संघटनांचे भिन्न प्रकार आणि आकार असतात. म्हणजेच त्यांच्यात संघटना भेद असतो. या दृष्टीने कथेची आणि इतर वाङ्.मयप्रकारांची तुलना डॉ. इंदुमती शेवडे यानी आपल्या "मराठी कथा उद्गम आणि विकास" या ग्रंथात केलेली आहे." ४

कथारचनेत अनुभवाचे एककेंद्रित्व असते. तर कादंबरी ही अनेककेंद्री असते. हा कथा आणि कादंबरीतील एक महत्त्वाचा भेद सांगण्यात येतो. कादंबरीत एक महत्त्वाचा भेद सांगण्यात येतो. कादंबरीत अनेक केंद्रे अनुभवाच्या अनेकविध संघटना असतात. या संघटनांचा परस्पर अनुबंध असतो. तसेच त्यांना स्वायत्त असे अस्तित्वही असते. त्यांच्यात स्वतंत्र विकसनशिलता असते. यामुळेच कादंबरीच्या अनुभवार्थात व्यामिश्रता येते. तसेच तिच्या संघटनेत लवचिकपणा व मोकळेपणाही येतो. गंगाधर गाडगीळ यांनी "दीर्घकथा" आणि "कादंबरी" यातील फरक स्पष्ट करताना "कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेसारखी अशी कल्पना मांडून कादंबरीतील अनेक केंद्रित्व सांगितले आहे. स्वतंत्रपणे विकास पावणारी अनेक कथाबिजे कादंबरीत असतात. वेगवेगळया घटकातून रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना असतात. पुष्कळदा तिच्यातील भिन्न कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात. कादंबरीतील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्पराशी कलात्मक संबंध मात्र निश्चित असतो. तसे नसेल तर या संघटना एका कादंबरीत एकत्र येणे हे अर्थशून्य ठरेल." ५

कथेत मात्र कादंबरीतल्याप्रमाणे स्वतंत्रपणे विकास पावू शकतील अशा भिन्न भिन्न अनुभव संघटनांचा गुच्छ नसतो. कथेबाबत डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले आहे की, "लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा मार्मिक अवकास पुरवणारा एकसुरी आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदना देणारा वाङ्.मय प्रकार आहे." ६

या त्यांच्या मताप्रमाणे लघुकथेचा भाषिक अवकाश कसा मर्यादित असतो आणि परिणामांच्या दृष्टीने लघुकथा अधिक संवेदनशील असते. हे त्यांचे मत लक्षात घेता कादंबरीच्या विचारात याच्या उलट येणारा अनुभव असणे स्वाभाविक आहे.

कादंबरीविषयी आपले मत मांडताना डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात की, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत. अशी साहित्यकृती असते." ७

नेमाडयांचे हे कादंबरीविषयक भाष्य त्यांनी मांडलेल्या कथाविषयक व्याख्येप्रमाणेच असलेली ही भूमिका सर्वमान्य होणारी आहे. कादंबरीत या सर्व गोष्टींमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय किंवा एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासह कादंबरीत मांडलेला असतो. एखाद्या पोटसमूहाचे, पोट संस्कृतीचे तपशिलांसह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहतात. त्यामुळे कादंबरीतून वास्तवाचे खरे स्वरूप प्रकट होऊ शकते.

कादंबरीच्या संस्कारात अनेकविधता असते. हा संस्कार अनेकांशी असल्याने अधिक व्यामिश्र व भरघोस असा असतो. त्यामुळे कादंबरीचे कथात्मक श्रेय कथेपेक्षा खूपच वेगळे असते. "कथा" हा स्फूट स्वरूपाचा प्रकार असल्यामुळे त्यात कलेची संपन्नता असलीतरी तिचे लघुरूपही स्वाभाविकच ठरते. याउलट कादंबरीचे दीर्घरूप हे ही स्वाभाविकच आहे. कादंबरीतील अनुभवार्थ कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण या सर्वच घटकांच्या दृष्टीने कादंबरीचे दीर्घत्व महत्त्वाचे ठरते.

"कथा" आणि "कादंबरी"च्या स्वरूपाची वैशिष्टये पाहत असताना कादंबरीतील सामाजिक आशय आणि संदर्भाचा तपशिल हा वास्तवाचे सत्यदर्शन

घडविणारा असल्यामुळे कादंबरी ही अधिक बर्हिमुख आणि वस्तुनिष्ठपणे त्यातील अनुभवार्थ जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. कादंबरीची प्रवृत्तीच वास्तववादाला जवळची आहे. मराठी कादंबरीच्या विकासातील पहिल्या टप्प्यावर आपणाला एकीकडे "यमुनापर्यटन" सारखी वास्तववादी कादंबरी आढळते. तर दुसरीकडे पूर्वपरंपरेने कथात्मक वाङ्.मयातून आलेल्या रंजनवादी कल्पिताला अधिक महत्व देऊन लिहिलेल्या "मुक्तामाला", "मंजुघोषा" यासारख्या रंजनवादी कादंबरीचा एक मोठा प्रवाह मराठी कादंबरीच्या प्रारंभीच्या टप्प्यात आढळतो. या पहिल्या टप्प्याचे ऐतिहासिक समालोचन करताना नरहर कुरुंदकरानी आपल्या "धार आणि काठ" या ग्रंथात मराठी कादंबरीच्या पहिल्या टप्प्यातच त्यांना आढळलेले बोधवादाचे आणि रंजनवादाचे प्रवाह त्यांनी विस्तृतपणे चर्चिले आहेत. परंतु मराठी कादंबरीची खरी सुरवात हरिभाऊ आपटयांपासून मानलीतर मात्र हरिभाऊंच्या सामाजिक कादंब-या उपरोक्त कादंबरीच्या तात्त्विक स्वरूप विवेचनाशी जुळणारा असल्याचे दिसते.

कादंबरी हा वाङ्.मयप्रकार वास्तववादाच्या जवळ जाणारा असला किंबहुना डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात त्याप्रमाणे "रिअॅलिस्टिक टच" हा कादंबरी वाङ्.मयाचा प्राणभूत विषय म्हणून सांगितला जातो." [8]

कादंबरी अनेक पदरी आशयसूत्राची आणि विस्तृत संरचना मांडणारी संघटना असल्यामुळे कादंबरी हा वाङ्.मयप्रकारच लवचिक, प्रसरणशिल आणि सर्वसमावेशक असा वाङ्.मयप्रकार आहे असे म्हणता येईल. त्यामुळेच साहित्यात साहित्य आणि समाज यांचे संबंध कलाजीवनवाद समाजवाद-व्यक्तिवाद, साहित्याची लोकाभिमुखता साहित्य व राजकारण, साहित्य व तत्वज्ञान इत्यादि वादांची जी रणधुमाळी माजली आहे ती मुख्यत्वेकरून कादंबरी या वाङ्.मय प्रकाराचे बहुविध स्वरूप लक्षात घेऊनच दिसून येते. त्यामुळे कादंबरी या वाङ्.मयप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण जरी सांगता आले नाही तरीही साहित्यातील प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेला हा वाङ्.मयप्रकार महत्वाचा ठरतो.

३. कथा, कादंबरीचे उपप्रकार :

"लघु कादंबरी" हा वाड्.मयप्रकार म्हणून पाहत असताना तिच्या स्वरूप निश्चितीसाठी "कथा" आणि "कादंबरी" या दोन्ही वाड्.मयप्रकारांची स्वरूप वैशिष्टयांची चर्चा जशी महत्वाची ठरते तशी कथा कादंबरीच्या उपप्रकारांची चर्चाही तितकीच महत्वाची ठरते. लघु कादंबरी हा एक वाड्.मय प्रकार म्हणून पाहत असताना तो कादंबरी या वाड्.मयप्रकाराची अनेक वैशिष्ठये घेऊन येतो. परंतु त्याची पृथगात्मकता सिध्द करण्यासाठी त्याच्या भाषिक अवकाशाच्या जवळ जाणा-या दीर्घकथेसारख्या कथेच्या उपप्रकारांची चर्चाही महत्वाची ठरते. म्हणूनच या विभागात कथा, कादंबरीच्या उपप्रकारांची चर्चा आपल्याला करावयाची आहे.

कथा आणि कादंबरीचे त्यातील आशय लक्षात घेऊन भयकथा, नीती-कथा, भावकथा, ग्रामीणकथा असे अनेक प्रकार संभवतात. तसेच कादंबरीचेही सामाजिक, राजकीय, पौराणिक, ऐतिहासिक असे आशयानुरूप अनेक प्रकार केल्याचे आढळते. परंतु आपण लघुकादंबरी या वाड्.मय प्रकाराची एक वाड्.-मयप्रकार म्हणून चिकित्सा करत असल्यामुळे कथा आणि कादंबरी यांचे उप-प्रकारही रचना दृष्टीने कोणते संभवतात ? हे पाहणे गरजेचे आहे. अभ्यासा-च्या सोयीसाठी लघुत्तम कथा आणि दीर्घकथा व त्यातही विशेषत: दीर्घ-कथा हा कथेचा उपप्रकार चर्चेसाठी महत्वाचा मानला आहे. तसेच कादंबरीचे "लघुकादबरी", कादंबरी, "बृहत् कादंबरी," असे उपप्रकार करता येतील. येथेही आपणास लघुकादंबरीची पृथगात्मकता दाखविण्यापुरतीच कादंबरी या वाड्.मय-प्रकाराची चर्चा करावयाची आहे. यापूर्वी कथा आणि कादबरी या वाड्.मय-प्रकारांची तात्विक चर्चा करताना त्या दोन्ही वाड्.मयप्रकारातील फरक स्पष्ट करतच आपण कथा आणि कादंबरीचे वाड्.मयप्रकार म्हणून असणारे वेगळेपण सिध्द केले आहे.

"लघुत्तम कथा" हा कथेचा एक उपप्रकार असून काही काळ या उपप्रकाराचे थोडेसे कौतुक झाले आणि हा उपप्रकार एकेकाळी विपुल प्रमाणात लिहिला गेला. आणि तिथेच तो अस्तित्वहिन झाला. कारण लघुत्तम कथा म्हणजे अति थोडया अवकाशात परिणाम करणारी एकसुरी कथा असल्यामुळे लघुत्तम कथेत फक्त कलाटणी तंत्रालाच महत्त्व मिळत गेले आणि या लघुत्तम कथा वाचकाला धक्का देणाऱ्या कथा ठरल्या. प्रसंगी विनोद निर्मितीसाठी ही तिचा उपयोग आचार्य अत्र्यांसारख्या साहित्यिकाने केला. मुळातच या उपप्रकाराच्या विकासाच्या कक्षा अत्यंत मर्यादित राहिल्या. त्यामुळे हा उपप्रकार आज जवळजवळ मरणोन्मुख ठरला आहे.

कादँबरी विभागातील "बृहत" कथा हा प्रकारही त्याच्या "बृहत" या संकल्पनेतून अवकाशाची प्रदीर्घता सूचीत करतो. संस्कृतमधील आर्ष महाकाव्य आणि इंग्रजीमधील इपिक (EPic ) किंवा "लिजेंड" (Legend ) या सदृश्य असणारी रचना मराठीत विरलत्वानेच आढळते. कै. म.मो. कुंटे यांच्या "राजा शिवाजी" या प्रयत्नानंतर अलिकडे श्री.ना. पेंडरयानी "तुंबाडचे खोत" या नावाची लिहिलेली साहित्यकृती "बृहत्" कादंबरीच्या संकल्पनेला जवळ जाणारी आहे. मराठी साहित्यात एक वाङ्.मयप्रकार म्हणून "बृहत" कादंबरीच्या रूपाविषयीची चर्चाही मराठी साहित्य विचारात आणि समीक्षेत केलेली आढळत नाही. दीर्घकथा मात्र अनेक अंगानी विकसीत होताना दिसते.

एकीकडे लघुकथा ही दीर्घकथेच्या अंगाने. मराठी कादंबरीचे आक्रमण आहे की काय असा प्रश्न उपस्थित होतो. म्हणूनच लघुकथा, दीर्घकथा, लघुकादंबरी व कादंबरी या चार निरनिराळया साहित्यप्रकारांचे रूपबंधाच्या अंगाने असणारे वेगळेपण निश्चितपणे ठरवता आले पाहिजे. परंतु अनेक ठिकाणी हे वेगळेपण सिध्द करताना काही चकवे मिळतात आणि यांच्या सीमारेषा धुसर बनत जातात. लघुकथा आणि दीर्घकथा हे दोन प्रकार लघुकथेचे

जवळचे नाते सांगणारे आहेत. अलिकडे या दोन्ही प्रकारात जो स्पष्टपणे दिसणारा रुपभेद पुसून टाकण्याकडे मराठी समीक्षेचा कल आहे. डॉ.भालचंद्र नेमाडे याची कारणमीमांसा देताना सांगतात की, "मराठी समीक्षा लघुकथेवर पोसली गेली आहे." [९अ]

'नेमाडयांनी "लघुकथा हा कमी लांबीचा चिंचोळा भाषिक अवकाश पुरविणारा एक्सुरी आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित म्हणून तिव्र संवेदन देणारा प्रकार आहे." [९ब] असे लघुकथेचे वैशिष्टये सांगितले आहे. नेमाडयांनी स्थलकालाच्या संकुचित्वामुळे हा प्रकार संवेदनशील असल्याचे म्हटले आहे. नेमाडेपूर्व कालात प्रा. ना.सी. फडके यांनी केलेल्या लघुकथेच्या व्याख्येत "शक्य तितक्या परिणामकारक रितीने आणि शक्य तेवढया कमी पात्र प्रसंगाच्या सहाय्याने सांगितलेली एकच एक गोष्ट म्हणजे लघुकथा" [१०] असे म्हणून लघुकथेच्या परिणामकारकतेवर भर दिला आहे. त्याचबरोबर कमी पात्र प्रसंगाचा उल्लेख करून एकच एक गोष्ट सांगण्याचा त्यांनी धरलेला आग्रह म्हणजेच नेमाडयांच्या लघुकथेच्या व्याख्येत असलेली प्रगल्भता जरी फडक्यांच्या व्याख्येत नसलीतरी दोन्ही व्याख्यांचे कालसापेक्ष मूल्यमापन करता दोघांनाही लघुकथेची लांबी कमी असावी हा अर्थ अभिप्रेत आहे. आणि त्याचबरोबरच लघुकथेच्या आशयद्रव्यात एक्सुरीपणा, एकात्मता अभिप्रेत असून अनेक केंद्री असू नये हेच अभिप्रेत आहे. तसेच लघुकथेतून येणारी तिव्र संवेदनशिलता तिच्या एकात्मतेच्या दृष्टीने महत्वाची ठरते. या पार्श्वभूमीवर दीर्घकथेचा विचार करीत असताना दीर्घकथेत लघुकथेपेक्षा लांबी वाढलेली असते.

दीर्घकथेच्या लांबी संदर्भात काही कमाल मर्यादेचे बंधन पडतेच. म्हणून तिचा विस्तार कादंबरीइतका असत नाही. दीर्घकथेत लघुकथेपेक्षा भाषिक अवकाश वाढला तरी आशय सूत्र एक्सुरीच राहते हे दीर्घकथेचे महत्वाचे लक्षण आहे. दीर्घकथा ही दीर्घकालखंड व्यापणारी असली किंवा लांबीरुंदीच्या

दृष्टीने तिचे साम्य लघुकादंबरीशी जुळणारे असलेतरी कथा या मूळ वाङ्.मय-प्रकारातील गुणधर्मांनीच ती लिप्त असते. दीर्घ कथेची रचनाही एकात्म आणि बांधेसूद असते. एकाच अनुभव संघटनेतून ती घडविलेली असते. ती दीर्घ काल-खंड व्यापणारी असल्यामुळे तिचा आशय प्रसंगी अनेकांशी असलातरी तो बहुविध नसतो. अनुभवाचे अनेक तपशील तिच्यात असलेतरी कथेप्रमाणेच तिच्यात एकच एक संस्कारित्व असते. म्हणूनच कथेप्रमाणे ती भावनात्मक पातळीवर राहाते.

हरिभाऊंच्या दीर्घकथेविषयी लिहिताना दा.वि. कुलकर्णींनी म्हटले आहे की, "तीस ते पन्नास-पंचावन्न पानाच्या दरम्यान असणाऱ्या या (हरिभाऊंच्या) दीर्घकथा कादंबरीप्रमाणे उपकथांनी युक्त असल्यातरी त्यांचे कथानक एकपदरी असून त्यांच्यात संकल्पितरित्या एकच एक प्रभावी संस्कार करण्याचे सामर्थ्य आहे. त्यामुळेच या कथाविस्तारातही एककेंद्री कथाबीज असून परिणामांच्या एकतानतेचा कोठेही भंग होत नाही. म्हणूनच त्यांना लघुकादंबरी न म्हणता त्यांच्या मूळ पिंड कथेचाच आहे असे म्हणावे लागते."[११]

प्रा. फडके यानी लघुकथा व कादंबरी या वाङ्.मयप्रकारांच्या तंत्रमंत्राचा विचार करीत असताना दीर्घकथेचा मात्र विचार केलेला नाही. कारण दीर्घ-कथा हा वाङ्.मयप्रकार फडकेपूर्वकाळात स्वतंत्रपणे विचार करावा इतपत विक-सित झालेला दिसत नाही. सुमारे १९५० नंतर मात्र दीर्घकथा लघुकादंबरी यासारखे साहित्यप्रकार हळूहळू विकसित होऊ लागले.

लघुकथा आणि दीर्घकथा या दोन्हीपेक्षा लघुकादंबरीत भाषिक अवका-शाचा विस्तार अधिक असतो. त्याचबरोबर आशयसूत्राचे पदर अनेक अंगानी वाढलेले असतात. त्यामुळे स्थलकालाची परिमाणेही वाढलेली असतात. परंतु

यालाही भाषिक अवकाशाच्या मर्यादा पडतात. कादंबरीइतका लघुकादंबरीचा अवकाश प्रदीर्घ किंवा विस्तृत नसतो. कादंबरीत आशयसूत्राची व्यामिश्रता असल्यामुळे कादंबरीतील अवकाश स्थलकालाला व्यापून त्यापलिकडचे वास्तव सूचवित असतो. कादंबरीच्या ह्या कालातीत सूचकशक्तीमुळे तिचा अवकाश कितीही मोठा असू शकतो. थोडक्यात लघुकादंबरीच्या भाषिक अवकाशाला असलेली मर्यादा लक्षात घ्यावी लागते. आणि त्याची कारणमिमांसा देताना नेमाडयांनी "आशयसूत्राचे पदर वाढलेले असतात असे म्हटले आहे." [१२]

लघुकादंबरीत आशयसूत्राच्या अनेकपदरी स्वरूपाच्या प्रमाणातच स्थलकालाच्या मर्यादा वाढलेल्या असतात. म्हणूनच लघुकादंबरीचा कादंबरीप्रमाणेच प्रदीर्घ अवकाश नसतो. लघुकादंबरीचे भाषिक अवकाशाचे तिच्या आशयसूत्राशी असलेले प्रमाण हे तिचे व्यवच्छेदक लक्षण ठरते. किंबहूना डॉ. भालचंद्र नेमाडयांनी लघुकथा, दीर्घकथा, लघुकादंबरी आणि कादंबरी या चारही प्रकारातील रूपांचा फरक पाहताना त्या त्या प्रकारांच्या भाषिक अवकाशाचे तिच्यातील आशयाशी असलेले प्रमाण हेच व्यवच्छेदक लक्षण मानलेले आहे. या एका तत्वातच डॉ. नेमाडयांनी या चारही साहित्यप्रकाराच्या रूपबंधातील फरक स्पष्ट केला आहे.

लघुकादंबरी आपल्या मर्यादित भाषिक अवकाशाच्या परिघातच आशयसूत्रातील अनेक पदर समर्थपणे उलगडून दाखवित असते. म्हणूनच कथा आणि कादंबरी यांच्या ठिकाणी जशी संपन्न कलानुभव देण्याची क्षमता असते तशी लघुकादंबरी सारख्या साहित्यप्रकारात कादंबरीसारख्या प्रदीर्घ साहित्यप्रकाराला साधता येणार नाही अशी विशिष्ट प्रकारची कलात्मक संघटना व जीवनदर्शन लघुकादंबरी मोठ्या सामर्थ्याने साधत असते. यातच लघुकादंबरीच्या स्वतंत्र अस्तित्वाचे सार्थत्व आहे.

## लघुकादंबरी एक वाङ्.मय प्रकार :

### ५. लघुकादंबरीचे स्वरूप आणिववैशिष्ट्ये :

लघुकादंबरी ही संज्ञा आजच्या मराठी वाङ्.मय समीक्षेत रूढ होत चालली आहे. इंग्रजीत लघुकादंबरीला "नॉव्हेलेट" (Novelette ) असे म्हटले जाते. या शब्दाचा कोषवाङ्.मयात दिलेला अर्थ लहान कादंबरी असा असून कथात्मक वाङ्.मय शाखेतील हा गद्यरूप प्रकार असून कथेपेक्षा त्याचे वाङ्.मयीन स्वरूप वेगळे मानून त्याचा विचार केला गेला आहे. आकराच्या दृष्टीने "नॉव्हेलेट" हा प्रकार "नॉव्हेल" पेक्षा लहान असल्यामुळे इंग्रजीच्या धर्तीवर "नॉव्हेल"पासून "नॉव्हेलेट"ची व्युत्पत्ती जशी शोधली जाते तशी मराठीत कादंबरीपासून "कादंबरिका" ही संज्ञा वापरण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु कथेला जशी "लघुकथा" ही संज्ञा वापरण्याची पध्दती रूढ झाली तशी "लघुकादंबरी" ही संज्ञा रूढ होत चालली आहे.

मराठी कादंबरीच्या काही अभ्यासकांनी कादंबरीची व्याख्या करीत असताना जसा कादंबरीच्या बाबत तिचा आकार साधारणत: तीन हजार शब्दापासून पाच हजार शब्दापर्यंत सिमीत मानला जावा असे म्हटले आहे. परंतु ही शब्दसंख्येची मर्यादा म्हणजेच केवळ आकाराचा निकष पूर्णपणे ग्राह्य ठरत नाही. किंबहुना आकाराची, लांबीची विशिष्ट मर्यादाही लघुकादंबरीला लावता येत नाही. मात्र कथेपेक्षा तिची लांबी जास्त असावी, आणि कादंबरीपेक्षा कमी असावी. असे सामान्यपणे म्हणता येईल. कथा आणि कादंबरी यांची प्रेरणा आणि प्रवृत्ती जशी भिन्न आहे. तशीच लघुकादंबरीची प्रेरणा आणि प्रवृत्तीही वेगळी आणि स्वतंत्र आहे.

काही अभ्यासकांच्या मते लघुकादंबरीत कथेप्रमाणेच पात्रांची संख्या मर्यादित असावी. मर्यादित पात्रसंख्येमुळे स्थलकालाच्या व्याप्तीवरही मर्यादा

येऊन लघुकादंबरी विशिष्ट मर्यादित आकारात साकार होईल. दीर्घकथा व लघुकादंबरी यात आकार दृष्टीने (लांबीच्या दृष्टीने) बरेच साम्य असल्यामुळे लघुकादंबरीच्या समचर्चेत दीर्घकथेचा विचार अपरिहार्य ठरतो. लघुकादंबरी ही आकाराच्या दृष्टीने दीर्घकथेएवढी असली तरी ही "कादंबरी" या मूळ वाङ्.मय प्रकारातील गुणधर्मांनी ती युक्त असते. म्हणूनच लघुकादंबरीचे आशयसूत्र ज्या अनुभवार्थातून घडलेले असते तो अनुभवार्थतच एकात्म नसून अनेकांगी आणि बहूविध असतो. अनुभवाचे अनेक स्तर लघुकादंबरीच्या आशयसूत्रात अभिप्रेत असतात. परंतु कादंबरीप्रमाणे त्याचे अनेकत्व विस्तृत असू शकत नाही. किंबहूना कादंबरीप्रमाणे ते स्वतंत्रपणे विकसित होत नसतात.

लघुकादंबरीच्या या वेगळ्या प्रवृत्तीचे भान लक्षात घेऊन आणि तिचे एक वाङ्.मय प्रकार म्हणून स्वतंत्र अस्तित्व मान्य करून तिच्या प्रेरणेचा शोध घेता काही लेखकांची व्यक्तिगत अनुभूतीच लघुकादंबरीची प्रेरणा ठरते असे दिसते. गटेसारख्या सुप्रसिध्द पाश्चात्य लेखकाने "सॉरोज ऑफ वर्थर" या लघुकादंबरीच्या निर्मितीबाबत म्हटले आहे की "माझ्या व्यक्तिगत अनुभूतीने या लघुकादंबरीस जन्म दिला आहे."

"कथा", "कादंबरी" या वाङ्.मय प्रकाराची तात्त्विक चर्चा करणाऱ्या अभ्यासकांनी मांडलेली लघुकादंबरीविषयक मते पाहिली असता लघुकादंबरीची अशी व्याख्या करता येईल की -

"कथेपेक्षा ज्यास्त व कादंबरीपेक्षा कमी भाषिक अवकाश असलेल्या या वाङ्.मयप्रकारात आशयसूत्राचे पदर वाढलेले असतात. त्यामुळे स्थल-कालाच्या कक्षाही रूंदावून लेखकाचा बहूविध अनुभवार्थ प्रभावीपणे व्यक्त करणारा वाङ्.मय-प्रकार म्हणजे लघुकादंबरी."

सर्वसामान्यपणे लघुकादंबरीच्या उपरोक्त व्याख्येवरून लघुकादंबरीचे स्वरूप लक्षात यावयास हरकत नाही.

## ६) लघुकादंबरीचे घटक :

लघु कादंबरी या वाङ्.मय प्रकाराची सविस्तर चिकित्सा करण्यासाठी लघुकादंबरीच्या घटकावयवांचा विचार अपरिहार्य ठरतो. अभ्यासाच्या सोयी-साठी आशयसूत्र, व्यक्तिचित्रण वातावरण, निवेदन असे घटक केलेले आहेत. लेखकाच्या अनुभवार्थाचा विचारही आशयसूत्रातच केलेला आहे. कारण अनुभवार्थ आणि आशयसूत्र हे परस्परापासून विलग करणे कठीण आहे. म्हणून आशय-सूत्रातच अनुभवार्थाचा विचार केला आहे.

### ६.१ आशयसूत्रे :

इतर वाङ्.मय प्रकाराप्रमाणेच लघुकादंबरीचा विषयही मानवी जीवन-विषयकच असतो. त्यामुळे लघुकादंबरीतील अनुभवार्थ हा मानवी जीवनासंबंधीच असतो. लघुकादंबरीकाराभोवती एक वास्तव लौकिक स्वरूपाचे जीवनविश्व असते. या वास्तव जीवनविश्वाच्या पार्श्वभूमीवरच आपल्या लघु कादंबरीत तो एक कल्पित विश्व निर्माण करीत असतो. हे विश्व मानवी भावविश्व जसे जाणि-वेच्या पातळीवर असते तसेच ते नेणिवेच्या पातळीवरही असू शकते. हे कल्पित विश्व वास्तवदर्शी वास्तवाचा आभास निर्माण करणारे आसते. लघुकादंबरी-तील अनुभवार्थ, लेखकाची संवेदनशिलता आणि अनुभव घेण्याची पध्दती यानुसार अनुभवाचे स्वरूप आणि गुणवत्ता तयार होते. लेखकाचा अनुभव प्रसंगी अंतर्मुख प्रकृतीचा, व्यक्तिकेंद्री, तसेच बहिर्मुख प्रकृतीचा तटस्थ वस्तुनिष्ठतेने घेतलेला असाही असू शकतो. त्याला व्यापक, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भही असतात. अनुभ-वार्थाच्या या विवेधतेतूनच लघुकादंबरी साकार झालेली असते.

लघुकादंबरीत वास्तवतेला अधिक महत्व असून त्या दृष्टीने कादंबरीचे आशयसूत्र महत्त्वाचे असते. हे आशयसूत्र लेखकाच्या जीवनविषयक दृष्टीकोणातून साकार झालेले असते. लेखकाने केलेल्या मानवी जीवनाच्या सूक्ष्म निरिक्षणातून जीवन व्यापणाच्या त्याला झालेल्या आकलनातून आणि त्याची व्युत्पन्नता

बहूश्रुतता व अभ्यास यातून त्याची जीवनदृष्टी समृध्द बनत असते. लेखकाच्या जीवनदृष्टीतूनच लघुकादंबरीत आलेल्या घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांच्या परस्पर अतूट संबंधातून निर्माण झालेल्या कथासूत्राला लेखकाची जीवनदृष्टीच अपरिहार्यपणे पुढेपुढे खेचित असते. म्हणूनच या कथासूत्राला आशयसूत्र म्हटले जाते. लघुकादंबरीत आशयसूत्र एकात्म स्वरूपाचे किंवा एकसूरी असत नाही. लेखकाच्या अनुभवार्थातच बहूविधता असल्यामुळे आशयसूत्रालाही आणखी काही पदर निर्माण झालेले असतात. लघुकादंबरीत उप आशयसूत्रेही असू शकतात. किंवा एकाच आशयसूत्राचे इतर पदरही महत्त्वाचे ठरून त्यांचेही प्रभावी दर्शन लघुकादंबरीत घडत असते. उदाहरणार्थ मोहन पाटील यांच्या "लिगाड" या लघुकादंबरीत बदलत्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवित असताना शेतीचे बदलते स्वरूप, ग्रामजीवनातील राजकारणाचे स्वरूप, सहकारी संस्थातील स्वाहाकाराचे स्वरूप, ग्रामजीवनातील सामान्य शेतक-यांचे कुचंबलेपण, मधूनच लक्ष वेधणारा निसर्ग असे बहूविध रूपातील आशयसूत्र लेखकाचा ग्रामजीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण तर स्पष्ट करतोच परंतु त्या बरोबरच ग्रामजीवनातील हे सारेच अनेकपदरी वास्तव तितक्याच प्रभावीपणे वाचकाला प्रत्ययाला येते. लेखकाचा जीवनविषयक दृष्टीकोण आणि अनुभवार्थाची जाणीव होण्यासाठी आशयसूत्र हा घटक लघुकादंबरीत महत्त्वाचा ठरतो.

### ६.२ व्यक्तिचित्रण :

व्यक्तिचित्रण हा कथात्मक वाङ्मय प्रकारातील महत्त्वाचा घटक आहे. लघुकादंबरीतही त्याचे महत्व अन्यन्यसाधारण आहे. कारण व्यक्तिचित्रणाच्या आश्रयानेच लघुकादंबरीचे कथानक सिध्द होत असते. लघुकादंबरीत येणा-या पात्रांचे प्रमुख कार्य कथानकाच्या निर्मितीला हातभार लावणे हेच होय. व्यक्तिचित्रण करण्यासाठी लेखकाला एखाद्या व्यक्तीची वृत्ती-कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपध्दती इत्यादींच्या चित्रणातून

कादंबरीप्रमाणेच व्यक्तींची एक शब्दरुप प्रतिमा निर्माण होते. व्यक्तीच्या या शब्दरुप प्रतिमेला "पात्र" असेही म्हटले जाते.

कथानकात ही पात्रे शब्दरुप असलीतरी त्यांना प्रत्यक्ष वास्तवातील माणसांप्रमाणेच शारीरिक मानसिक व सामाजिक अंगे लाभलेली असतात. कथानकातील प्रत्येक पात्राला स्वत:चे वैशिष्टयपूर्ण असे भावविश्व किंवा व्यक्तित्व लाभलेले असते. परंतु हे पात्र प्रत्यक्षातील व्यक्तीप्रमाणेच स्वतंत्र नसते. कथानकाची किंवा लघुकादंबरी या स्वबंधाची निर्मिती हे त्याचे कार्य असल्याने ते त्या त्या संदर्भात कथानकाला बांधिल असते. पात्र हे कथानकाचे अंगभूत घटक म्हणून जसे ते कथानकात क्रियाशील असते, तसेच दुस-या अंगाने हे पात्र प्रत्यक्षातील मानवी विश्वासी किंवा भावविश्वाशी विशिष्ट प्रकारचे नाते प्रस्थापित करीत असते. काही अभ्यासकाच्या मते ही पात्रे सामान्यत: प्रत्यक्षातील माणसांच्या अनुकृतीतून निर्माण झालेल्या शब्दरुप प्रतिमा असतात. लघुकादंबरीकाराला आपल्या साहित्यकृतीतील पात्र निर्माण करीत असताना काही नैसर्गिक मर्यादा असतात. मर्यादित अवकाशातच नेमकेपणाने व्यक्तिवैशिष्टये दाखवित आशयसूत्राला अनुसरुन पात्रनिर्मिती करणे हे लघुकादंबरीकारासमोरील एक कलात्मक आव्हान असते.

६.३ वातावरण :

कोणातीही लघुकादंबरी एका विशिष्ट स्थलकालाच्या चौकटीत एका विशिष्ट भौगोलिक तसेच सामाजिक व सांस्कृतीक परिसरात घडत असते. याबरोबरच लघुकादंबरीतून एखादी विशिष्ट भाववृत्ती प्रकट होत असते. वातावरण हा घटक कोणात्याही साहित्यकृतीचा जिवंत प्रत्यय देण्यासाठी महत्त्वाचा घटक ठरतो. वातावरण हा साहित्यनिर्मितीतील एक क्रियाशील घटक असतो. जुन्या समीक्षेत वातावरणाला दुय्यम स्थान देऊन वातावरणाचे अस्तित्व

पार्श्वभूमीसारखे असते असे म्हटले जाते. असे. परंतु साहित्यकृतीत जो एक कल्पित परिसर निर्माण झालेला असतो. त्याला विशिष्ट स्थलकालाच्या चित्रणामुळे कल्पनेच्या पातळीवर असूनही ते वातावरण संवेद्य होत असते. पात्रांच्या जीवनकथेला यातूनच एक आधारभूमि प्राप्त होत असते. कोणत्याही साहित्यकृतीला पात्र, घटनाप्रसंग, नाटय संघर्ष याबाबत वातावरण हा घटक महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडत असतो. विशेषत: मोहन पाटलांच्या कादंबरीच्या संदर्भात आलेली आजच्या ग्रामीण जीवनाचे वातावरण त्यातील तपशिलामुळे आशयसूत्राचा प्रभावी परिणाम करून गेले आहे.

६.४ निवेदन :

कोणत्याही कथात्म वाङ्.मयाचे निवेदन कथनपरच असते. म्हणून कथन हे लघुकादंबरीचेही एक महत्त्वाचे वैशिष्ठये होय. अनेक कथा, कादंबरीत किंवा लघुकादंबरीत लेखकाने एक निवेदकपात्र निर्माण केलेलेअसते. हे निवेदक पात्र आपल्या विशिष्ट दृष्टीकोणातून वाचकाला कथानकाचे कथन करीत असते. कथानकातील समग्र भावविश्वाचे सूत्र चालन लेखक करीत असतो. तो बहूधा निवेदक पात्राच्या सहाय्याने करतो. कथावस्तुशी एकरूप होऊन लिहिणे समरसून निवेदन करणे हे निवेदनाचे दोन प्रकार होऊ शकतात. या दोन प्रकारात कथानकाच्या किंवा आशयसूत्रानुसार विविध छटा संभवतात. काही ठिकाणी निवेदक प्रथमपुरुषीही असू शकतो. तृतीयपुरुषी निवेदन करणारा निवेदक कथे-बाहेर असल्यामुळे त्यांने केलेले चित्रण अलिप्त होऊ शकते. अशा निवेदकाची भूमिका निरिक्षकाची असते.

कथानकाच्या निवेदक कोण असावा आणि त्याचे स्वरूप कोणते असावे याची निश्चिती लेखकाच्या कलात्मक हेतूनुसार असू शकते. निवेदक काही वेळा पात्र प्रसंगादीवर भाष्यही करीत असतो. या भाष्याद्वारे कित्येकदा पात्राच्या

मन:स्थितीचा त्यांच्या कृतीचा किंवा एखाद्या प्रसंगाचा अर्थ उलगडूनही सांगितला जातो. काही वेळा त्याचे मूल्यमापनही केले जाते. त्यामुळे निवेदक हा निश्चित स्वरुपाच्या नैतिक मूल्याचे अधिष्ठान असलेला भाष्यकार ठरतो. जीवनासंबंधी प्रसंगी तो तत्वविचारही मांडत असतो. या निवेदनात संवाद हा ही घटक असू शकतो. पण नेहमीच कथानक संवादातून साकार होते असे नाही.

लघु कादंबरीचे निवेदन ज्या भाषेत साकार होत असते ती भाषाही महत्वाची असते. कारण लघुकादंबरीत निर्माण केलेले कल्पितविश्व विशिष्ट भाषिक खंडातील असेल तर विशिष्ट रितीने तेथील भाषेचा वापर केल्याने कथानकाला जीवंतपणा येतो. भाषा हा एका अर्थाने निवेदनाचाच एक उपघटक ठरतो. साहित्य निर्मितीसाठी गद्य भाषेचा वापर करताना ललित लेखकाला व्यक्त करावयाचे असलेले अनुभव कदाचित्त भाषेचे रुढ संकेत मोडून किंवा भाषेचे तर्कनिष्ठ नियमांचे उल्लंघन करुन तो नवी भाषिक अभिव्यक्ती सिध्द करतो. आणि त्यातून त्याला अभिप्रेत असणारी जीवनदृष्टी किंवा आपल्या अनुभवार्थाची नवनिर्मिती साधतो.

कोणत्याही साहित्य प्रकाराप्रमाणेच लघुकादंबरीलाही तिचे म्हणून एक तंत्र असते. काही संकेत असतात. तंत्र म्हणजे अर्थातच कारागिरी किंवा बंदिस्त नियमावली नव्हे. आकाराला येऊ पाहणारी प्रत्येक नवी साहित्यकृती ही रुढ साहित्यप्रकाराकडून नवी मागणी करीत असते.

लघुकादंबरी या वाङ्मयप्रकाराचा रुपविचार करत असताना आपल्याला मराठी कथेचा आणि कादंबरीचा विकास आणि त्यातील प्रयोगक्षमता ही लक्षात घेणे गरजेचे आहे. किंबहुना कथा, कादंबरी आणि त्यांचे उपप्रकार लक्षात घेऊनच प्रस्तुत प्रकरणात लघुकादंबरीचा एक वाङ्मयप्रकार म्हणून विचार करुन तिच्या घटकावयवांची मांडणी केलेली आहे.

७) समारोप :

"लघुकादंबरी" हा एक वाङ्.मयप्रकार म्हणून चिकित्सकपणे चर्चा करण्याचा या प्रकरणातला प्रयत्न प्रबंधिका विषयाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. किंबहूना मराठी कादंबरी वाङ्.मयाच्या चर्चा चिकित्सेतही अभ्यासकांनी एक वाङ्.मयप्रकार म्हणून लघुकादंबरीची स्वतंत्रपणे चिकित्सा केलेली नाही. कथात्मक वाङ्.मयाची परंपरा पाहत असताना ही परंपरा अतिप्राचीन असून वैश्विक साहित्यातही तिचे महत्व आहे. मराठी कथात्मक साहित्य परंपरा समृध्द आणि विविधांगी आहे. अर्वाचीन कालखंडात कथात्मक साहित्यातून विकसित झालेले वाङ्.मयप्रकार म्हणजे कथा आणि कादंबरी हे होत. अभ्यास विषय असलेला "लघुकादंबरी" हा वाङ्.मयप्रकार कथा आणि कादंबरी यांच्या मधल्या अवस्थेत येत असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणात कथा आणि कादंबरीचे उपप्रकार पाहून दीर्घकथा आणि लघुकादंबरी यांचा आवाका (लांबी) सामान्यत: सारखीच असल्यामुळे या दोन प्रकारांच्या रूपांची विशेष चर्चा केली आहे. आणि त्यातील स्वरूपभेद स्पष्ट करून त्यांची पृथगात्मकता सिध्द केली आहे.

लघुकादंबरी ही कथेपेक्षा जास्त भाषिक अवकाश व्यापणारी असलीतरी कादंबरीपेक्षा तिचा अवकाश कमी असून मूळ "कादंबरी" या वाङ्.मयप्रकारातील गुणधर्म तिच्यात आढळत असल्यामुळे तिचे दीर्घकथेपासूनचे वेगळेपण सिध्द केले आहे. आणि त्याचबरोबर कादंबरी आणि लघुकादंबरी यातील भाषिक अवकाशाबरोबर त्यातील आशयद्रव्यात अनुभवार्थात आणि स्थलकालाच्या मर्यादेत असणारा फरक लक्षात घेऊन दोहोंच्या परिणामकारकतेचे वेगळेपणाही सिध्द केले आहे. त्यातूनच लघुकादंबरीची स्वरूपवैशिष्टये दाखविणारी एक व्याख्याही तयार केली आहे. त्यानंतर लघुकादंबरीत येणाऱ्या घटकांची सांगोपांग चर्चा करून लघुकादंबरीच्या अंतरंगाचा विस्तृतपणे उहापोह केला आहे. यावरून लघुकादंबरीच्या रचनेची वैशिष्ठये लक्षात यावयास हरकत नाही. आणि एक स्वतंत्र वाङ्.मय प्रकार म्हणूनही तिचा विचार करणे आवश्यक ठरते.

कथात्मक वाङ्‌मयात आधुनिक काळात रूढ झालेला "कथा" आणि "कादंबरी" या वाङ्‌मयप्रकाराची लोकप्रियता लक्षात घेता लघुकादंबरी तसा लोकप्रिय वाङ्‌मयप्रकार नाही. परंतु आजच्या वेगवान आणि व्यस्त जीवनात "लघुकादंबरी" हाच वाङ्‌मयप्रकार अधिक वाचकप्रिय ठरेल असे वाटते. त्याचबरोबर लघुकादंबरीत येणारे अनुभवविश्व हे आजच्या बदलत्या जीवनातील अनुभवांची सिमित मांडणी तितक्यात प्रभावीपणे करण्यासाठी उपयुक्त ठरेल. "लघुकादंबरी" कल्पनारम्यतेपेक्षा अनुभवाला सरळ भिडते आणि अनुभवाचे सर्वच पदर तिच्यातील वास्तव प्रखरपणे जाणवून देते. आजच्या काळाची गरज म्हणून "लघुकादंबरीचे" हे वेगळे वैशिष्ठ्ये लक्षात घेतले असता हा वाङ्‌मयप्रकार रूढ आणि रसिकमान्य होईल असा विश्वास वाटतो.

.....

## प्रकरण पहिले

## संदर्भसूची


१. सरदार, गंगाधर बाळकृष्ण – "अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका", पुणे, मॉडर्न बुक डेपो, तृ.आ. १९७१, पृ. ३१–४०.

२. हस्तक, उषा – "कादंबरी" (लेख समाविष्ठ) "साहित्य अध्यापन आणि प्रकार" (संपादक, भागवत पु.भा. रसाळ सुधीर इतर) मुंबई, पॉप्युलर प्रकाशन प्र.आ.१९८७, पृ. २५४–२५५.

३. फडके, ना.सी. – "मराठी साहित्यदर्शन" (संपादक, मो.रा. वाळंबे), पुणे, अ.वि.प्रकाशन, प्र.आ.१९७३, पृ. ७४.

४. शेवडे, इंदुमती – "मराठी कथा उगम आणि विकास", मुंबई सोमय्या पब्लिकेशन, प्र.आ.१९७३,पृ.५४९.

५. गाडगीळ, गंगाधर – "साहित्याचे मानदंड", मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, प्र.आ. १९६२, पृ. २०७.

६. नेमाडे, भालचंद्र – "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप" (१९५० ते १९७५) (संपादक गो.मा.पवार, म.द. हातकणंगलेकर) मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, प्र.आ. १९८६, पृ. २३.

७. नेमाडे, भालचंद्र - "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप" (१९५० ते १९७५) (संपादक गो.मा.पवार, म.द.हातकणंगलेकर) पॉप्युलर प्रकाशन,मुंबई, प्र.आ.१९८६, पृ. २४.

८. बांदिवडेकर, चंद्रकांत - "मराठी कादंबरीचा इतिहास", मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्र.आ.१९८९, पृ. ५.

९अ नेमाडे, भालचंद्र - "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप" (१९५० ते १९७५) (संपा.गो.मा.पवार, म.द.हातकणंगलेकर) पॉप्युलर प्रकाशन, प्र.आ. १९८६, पृ.२४

९ ब " तत्रैव पृ. २४

१०. फडके, ना.सी. - "मराठी साहित्यदर्शन( संपादक मो.रा.वाळंबे) अ.वि.गृह प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९५९, पृ. ७१.

११. कुलकर्णी, दा.वि. - "मराठी कथा स्वरूप आणि अस्वाद", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९७५, पृ.१२६.

१२. नेमाडे, भालचंद्र - "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप" (१९५० ते १९७५) (संपादक गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८६, पृ. २४.

.......